म. ग्रं. सं. ठाणें

विषय: चरित्र

लेखक: [illegible]

सन: १८८१

महालय क्रमांक: ५९ / १९८

पुस्तकाचें नांव: जवानां मर्द मराठे गडी

४९

चरित्र

नं. ११८

"केसरी"-"धनुर्धारी"-रचित
महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावली.

# जवानमर्द मराठे गडी.

## ( १ सुभेदार मल्हारराव होळकर. )

"वाहवाजी मल्हार, नांव केलें खूब राहिलें दुनियेंत ॥
लक्ष जिवांचा पालनवाला चंद्र लोपला गगनांत ॥"

( पोंवाडा. )

जनार्दन महादेव गुर्जर

ह्यांनीं

मुंबईंत

"निर्णयसागर" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

जुलै सन १८९१.

( सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत २ आणे.

# स्मरण.

या आपल्या अफाट देशांत अनेक जातींचे, अनेक भाषा बोलणारे आणि अनेक प्रांतांचे लोक आहेत. पण त्या सर्वांत मराठे, महाराष्ट्र भाषा बोलणारे, आणि महाराष्ट्र प्रांतांत राहणारे आहेत त्यांची बरोबरी कोणाच्यानें आजवर कधींच करवली नाहीं. पक्क्या कंगालगिरींतल्या लोकांनीं एका शतकाच्या आंत मोंगलबादशाहीसारखी इमामदांडगी इमारत झटक्या-सरशी पाडून जमीनदोस्त करावी हें काय लहानसान आश्चर्य! ही काय कमी कर्तबगारी? आणि हा काय यःकश्चित् अपूर्व प्रभाव? साऱ्या पृथ्वींत अतिशूर ह्मणून नांवाजलेल्या जाती का-यत्या दोन. युरोपचे **स्पार्टन** कीं हिंदुस्थानचे **रजपूत**. पण त्या रजपूतांस सुद्धां खडे चारावयास लाविलें; त्यांच्यानें जाहलीं नाहींत अशीं कामें केलीं; एकदोनच प्रसंगीं कां होईना, पण दांतीं तृण धरावयास त्यांना लाविलें, तेव्हां त्या मराठ्यांच्या शौर्यास, त्यांच्या कर्तबगारीस आणि त्यांच्या तेजस्वीपणास या देशांत दुसरी साम्यता नाहीं हें खचीत! धन्य धन्य त्या मराठ्यांची, कीं ज्यांनीं आपला मायदेश आणि आपला मायधर्म इमाम दांडग्या क्रूर मानवराक्षसांच्या जबड्यांतून सोडविण्या-साठीं आपल्या प्राणांकडे किंवा कश्शाकडे काडीभरही पाहिलें नाहीं. त्या थोर व तेजस्वी कर्तृत्ववान पुरुषांचा महिमा को-ठवर वर्णावा? आणि त्यांच्या कोणकोणत्या ह्मणून मर्दुमक्या गाव्यात?

आमचे **श्रीमंत छत्रपति शिवराजे** या मराठी राज्याचे मूळसंस्थापक. श्रीमच्छंकराचार्यजगद्गुरु यांनीं आपला आर्य

धर्म स्थापिला. आणि शिवछत्रपतींनीं त्या धर्मास राखिलें. या छत्रपतींचे आह्मांवरील उपकार अनंत आहेत. ते किंवा त्यांतील अल्पांश सुद्धां फिटण्याची आशा नाहीं. सदैव त्यांच्या उपकारऋणांत आह्मांला बद्ध होऊन पडलेंच पाहिजे. श्रीशिवछत्रपति, त्यांचे वंशज व त्यांचे जातभाई, इतर कुलवंत मराठे, या आपल्या महाराष्ट्रास सदैव पूज्य आहेत. कारण या "जवानमर्द मराठे गड्यांनीं" आह्मांला आजपर्यंत हिंदु राहूं दिलें; आह्मी माणसें आहोंत, तेजस्वीपुरुष आहोंत, कर्तृत्ववान् मर्द आहोंत इत्यादि स्तुति, कट्या दुष्मनाच्या तोंडून निघावी असें त्यांनीं केलें! खरोखर आमच्या मराठे मंडळीनें आपलें अपूर्व क्षात्रतेज फांकवून साऱ्या राष्ट्रांचे डोळे क्षणभर दिपविले. आपल्या जवानमर्दपणानें या आमच्या राष्ट्राकडे वांकडा डोळा करून पाहीन ह्मटलें तर सुद्धां धैर्य होऊं नये; गाळण व्हावी, अशी दहशत बसविली; आपल्या अतुल प्रतापानें सारें भरतखंड दणदणावून सोडिलें; निस्सीम स्वामिभक्तकार्यपरायणतेमुळें आमच्या महाराष्ट्रदेशाचा दबदबा चोहोंकडे बसविला; फार काय सांगावें? या महान्शौर्य, विनय आणि भाग्यशाली **जवानमर्द मराठे गड्यांनीं** आपल्या एकोप्यानें, स्वामिसेवापरायणतेनें, गोब्राह्मणप्रतिपालनाच्या जबरदस्त इच्छेनें आणि अपूर्व क्षात्रतेजानें आपला मायदेश, आपली मायभाषा, आपला मायधर्म आणि अखेर आपले आपण या सर्वांस त्रैलोक्यांत धन्य करून सोडिलें! तेव्हां त्यांच्या "जवानमर्दपणा"ची थोडथोडकी हकीकत कळेल तर तिचें वाचन अनेक प्रकारें कल्याणप्रद होईल यांत संशय नाहीं. आणि तें तसें व्हावें ह्मणून फुरसतीप्रमाणें आणि सवडीनें आमच्या देशांतील "जवामर्द मराठे गडी" ह्यांच्या

वंशजांच्या मुलाखतीखातर त्यांस हळू हळू पुढें आणावें अशी इच्छा आहे. आपल्या उपकारकर्त्यांचें वारंवार स्मरण ठेवणें त्यांच्या कृतोपकारांचें कौतुक मानणें, त्यांच्या चरितामृताचे वारंवार घोंट घेणें, याखेरीज कृतज्ञता दर्शविण्याचा अन्य मार्ग या मेषपात्री मन्वंतरांत उरला नाहीं ! यास्तव तसा प्रयत्न करण्याच्या महत्कार्यास आरंभ, आंगच्या योग्यतायोग्यतेचा फारसा विचार न करितां, केला आहे. तो सिद्धीस जावो, त्यांतलीं न्यूनें वाचकांच्या हातून कळोत, आणि ही माझी सेवा त्या परमपूज्य "मराठे गड्यां"च्या खऱ्या योग्यतेस अनुरूप जाहली नसेल, तर तशी करण्याची मजपेक्षां विद्वान्, व योग्यतेच्या मनुष्यांस बुद्धि सुचो अशी प्रार्थना आहे ती सफळ होवो.

"धनुर्धारी."

---

# जवानमर्द मराठे गडी.

## (१) सुभेदार मल्हारराव होळकर.

नदीचा उगम क्षुद्र असावा, अफाट वृक्षाचें बीं अति सूक्ष्म असावें आणि खऱ्या थोरपुरुषाचें जन्मस्थान फार क्षुल्लक असावें तर त्यांतच मजा आहे. तेंच भूषणास्पद होऊन कौतुकाला कारण होतें. अपूर्व करामतीच्या परमतेजस्वी पुरुषाला त्यांचें क्षुद्रकुळ किंवा प्रारंभींची कंगालगिरी उलट जास्त बाहार आणिते. सर्व सामुग्री जय्यत आणि सरस असतां षड्रसान्न पकविणाऱ्या सुभगेचें त्यांत विशेष कौशल्य नाहीं किंवा स्वसेनेचा, पुरा पाठिंबा आणि यथायोग्य सर्व अनुकूलता असतां सेनानीची मारलेली फत्ते विशेष कौतुकाची नव्हे, त्याचप्रमाणें कुटुंबाचा, कुळाचा, श्रीचा वगैरे पाठिंबा असतां नांव गाजविलें तर तो कुळदीपकपणा ह्मणण्यासारखा आश्चर्यकारक नव्हे.

तर, असलेल्या जाड्याभरड्या सामुग्रींतच ब्रह्मदेवास लाळ घोटतां येईल असा पाक तयार करण्यांत किंवा स्वतःच्या मनगटावर समशेर मारण्यांत खरें कौशल्य व कर्तबगारी आहे. त्याचप्रमाणें ना कुळाचा, ना कुटुंबाचा, ना कश्शाचा थारा अशा स्थितींत कुळदीपकपणा पत्करावा तर तें खरें तेज, खरें कर्तृत्व आणि खरा मर्दपणा होय. थोर थोर ह्मणविणाऱ्या पुरुषांची बाल्यावस्था किंवा प्रारंभींची अनुकूलता सदा यःकश्चित् असावयाचीच; काळोखच नाहीं तर तेज कसें फांकणार? उजेडांत दिव्याचा काय प्रकाश लक्ष्यांत येईल! तसेंच प्रारंभीं सर्व सि-

द्धता आहे तर पुढला पराक्रम कसा ध्यानांत यावा; गाजविला पराक्रम तर त्यांत नवल तें कोणतें ? ह्मणूनच वहुतकरून सर्व खरे थोर पुरुष प्रारंभीं फार यःकश्चित् असतात.

ह्मैसूरकर हैदरनाईक, इंग्रजाला पुरून उरला होता; पेशवे, निजाम, अशांना जड जाहलेला. पण प्रारंभीं तो वसूलीचा यःकश्चित् शिपाई होता. चार बादशाही सफेजंग बुडवून मोंगलास कर्दमकाळ वाटणारा आणि महाराष्ट्रियांच्या पूर्ण मानास आणि स्तुतीस पात्र जाहलेला **श्रीशिवछत्रपति** साधारण शिलेदाराचा मुलगा. **"सदायशवंत पुण्यप्रतापी"** पंतप्रधान, पेशवाई मिळविणारा **बाळाजी विश्वनाथ** एका खेडेगांवचा कुळकर्णी होता. वीरशिरोमणी **गोखलखां बापू** लहानपणीं गुरें राखीत असे. महान् तेजस्वी व प्रखर विद्वान् ब्राह्मण **रामशास्त्री परभुणे** पेशवे सरकारचे मुख्य न्यायाधीश बालपणीं शागिर्दी करीत. आणखी अशीं किती उदाहरणें द्यावींत ? तेव्हां सारांश मिळून इतकाच कीं, थोर पुरुषाचा जन्मकाल अप्रसिद्ध कुळांत असतो व त्याजपासून तें कूळ प्रसिद्ध होतें. असो.

भोजविक्रमादि महान् प्रतापशाली नृपश्रेष्ठांनीं सालंकृत केलेल्या भूमीचें सर्वसाम्राज्य भोगणारा, साऱ्या हिंदुस्थानाला वचक बसविणारा, आपल्या अपूर्व शौर्यदिनकरापुढें मोठमोठ्या राजांस, नबाबांस, बादशहांस, आणि खानसाहेबांस दिवाभीताप्रमाणें खालीं तोंडें करून बसावयास लावणारा, सरकारचा केवळ उजवा हात किंवा त्यांच्या बादशाहीचा खंबीर खांब असें खुद्द पेशव्यांकडूनच वारंवार ह्मणविणारा साक्षात् मल्हारीप्रमाणें आपलें शौर्य फडकविणारा, **शूर वीर सुभेदार मल्हारराव होळकर**, नीरानदीच्या तीरीं पुणेंजिल्ह्यांतल्या होळनामक गांवीं

**कोंडबा** धनगराच्या पोटीं जन्मास आला. मल्हारीच्या पांचव्या वर्षीच बाप वारला. त्यामुळें या मुलाला ओलीकोरडी भाकर देखील वेळेला मिळेना. काय करील ? त्याचा मामा नारायणजी ह्मणून खानदेशांत एक शेतकरी होता. त्यानें आपल्या भाच्यास घरीं नेलें आणि आपलीं मेंढरें राखावयाच्या कामास लाविलें. मेंढरें राखून **मल्हारी** आपलें पोट भरी ! साऱ्या हिंदुस्थानांतल्या कडव्या मुसलमानांस मेषपात्र करून बसविणाऱ्या जवान पठ्याला हें लहानपणीं फारच उमदें काम मिळालें ह्मणावयाचें. असो. **मल्हारी** नांवालौकिकास चढेल असें त्याच्या मामाच्या मनानें घेतलें. ह्मणून कदम बांडे यांजपाशीं आपल्या भाच्यास बारगिरी लावून दिली असतां बरें होईल, असें नारायणजीस वाटे आणि त्याप्रमाणें त्यानें केलें. ह्मणजे मेंढ्या सुटून **मल्हारबाच्या** हातीं एक घोडा प्रथम आला. तेथें तो हुषार बारगीर असा प्रसिद्ध असे. इतक्यांत मोंगलाशीं कटकटी सुरू जाहल्या, त्यांत ह्या **मल्हारीनें निजामुल्मुलुखाच्या** एका मातबर सरदारास ठार केलें. त्यामुळें त्याचें नांव लष्करांत चारचौघांच्या तोंडीं अर्थात जाहलें यांत नवल नाहीं. अशाच प्रकारें एकदोन कामगिऱ्यांमुळें **मल्हारी** सर्वांस महशूर होत चालला. **बाजीराव बल्लाळ** पेशवा त्यावेळीं होता. तो पेशवा ह्मणजे काय ? जसा काय केवळ रणनवराच. लढाई हा त्याचा खेळ. शूर सरदार त्याचे दोस्त. दारूगोळा त्याचीं फुलें पुष्पें. लढाईची सुरुवात ह्मणजे हल्लींच्या ब्राह्मणांस पंचपक्वान्नाचीं भोजनें वाटतात, तशी त्याला वाटे. एकदां हा पेशवा माळव्यांतून चालला तेव्हां वाटेंत **कदमांशीं** कलागती उद्भवल्या. त्या **मल्हारीनें** मिटविल्या. तेव्हां तो **मल्हारी** कसा आहे हें

पाहवें आणि जुळल्यास त्याला पदरीं बाळगावें अशी साहजिक इच्छा बाजीरावाला जाहली. त्याप्रमाणें त्यानें केलें. पांचशें घोडा **मल्हारीच्या** सुपूर्द करून बारा परगण्यांची शिवाय वर. जाहगीर दिली. जाहलें, **मल्हारीचें** नशीब खुललें. धनगरपणाचा *टिळा गेला.* **मल्हारराव** बनले. ह्मणजे रंकाचे राव जाहले.

पण तसा प्रसंग हल्लीं नाहीं. ते राजे गेले. त्यांचा गुणग्राहकपणा गेला. आणि सर्वच कांहीं आटोपलें. आतां रंकाचा राव होणें कठीण. पुढें पुढें करून गोंडा घोळिला तर रावसाहेबी रावबहादुरी कागदोपत्रींची हवी असल्यास मुबलक मिळते ! असो.

पुढें **बाजीरावानें** माळव्यावर स्वारी केली. मोंगलाच्या ताब्यांतला तो मुलूख. **दायबहादर** हा तेथला सुभेदार. तोही कडवा फार. मागें पाठिंबा दिल्लीपतीचा. **बाजीरावानें** अशाशीं कटकट मांडिली. लढाईचा म्होरकेपणा मल्हाररावाकडे होता. **मल्हाररावाच्या** सद्दीचा जोर ह्मणा किंवा समशेरीचा प्रभाव ह्मणा **सुभेदार दायबहादर** ठार जाहला. मराठ्यांस फत्ते मिळाली. **बाजीराव** खुष जाहला. ह्मणून लगेच तो सुभा **मल्हारजीस** बहाल केला ! पेशव्यांनीं आपल्या इमानी शूर सरदाराचें गौरव केलें. सेवेच्या योग्यतेप्रमाणें बक्षीस दिलें. *माळव्याची* सर्व व्यवस्था पेशव्यांनीं मल्हारबास सांगितली; तेव्हां मल्हारबा धनीपणानें माळव्यांत वागत. हाताखालीं सैन्य जाहलें; इतमाम वाढला. धन, द्रव्य मुबलक मिळालें. शूर मराठागडी ठरला. त्यामुळें यापुढें होत त्या सर्व मोहिमांत बहुशः **मल्हारराव** असे. नबाब हैदराबादकर यांजशीं कटकटी जाहल्या त्यांत हा होताच. तहांत मुलूख ठरला तेव्हां या इमानी सरदारास पेशवे विसरले नाहींत.

इतक्यांत इकडे **चिमाजीअप्पा** ( बाजीरावांचे बंधु ) यांच्या मनांत "कोंकण काबीज करावें" असें आलें. त्याप्रमाणें लष्कर सज्ज होऊन चाललें. मल्हारराव होळकर त्याप्रसंगीं होते. ही मोहीम मोठी कठीण होती. कारण तेथें अंमल फिरंग्याचा असे. शिवाय वसईकिल्ला समुद्रांत "त्या समयीं आपासाहेब यांनीं जहाजें तयार करून आरमार जमवून समुद्रांतून लढाईचा उद्योग केला. तीन वर्षें वसई भांडली. किल्ला हस्तगत होतां दिसत नाहीं. मनुष्य फार कामास आले—लढाईत मेले—नउलाख बांगडी फुटली." असा प्रकार असे, तेव्हां "सर्व सरदार जमा करून त्यांजला अप्पासाहेब बोलले, किल्ला हस्तगत होत नाहीं. याजकरितां मजला तोफेच्या तोंडीं बांधून माझें डोकें तरी किल्ल्यांत पाडावें नाहीं तर किल्ला घ्यावा" याला सर्व सरदारांनीं व **मल्हाररावानें** उत्तर दिलें "जो आपला निश्चय झाला तोच नेम आमचा आहे." आणि पुढें किल्ल्यांतील भेद आणवून अखेर किल्ला हस्तगत हा केलाच. मल्हारावाची मर्दुमकी या वेळीं फार फार कामास आली. तिकडला प्रांत फत्ते करून परत निघणार तोंच नादिरशहाची हिंदुस्थानावर स्वारी जाहल्याचें वर्तमान कळलें, ह्मणून, मल्हारराव हिंदुस्थानाकडे चालते जाहले.

उत्तरहिंदुस्थानांत गेल्यावर इकडल्यातिकडल्या सटरफटर लुटालुटी पुष्कळ जाहल्या. माळवा सारा कबजांत घेतला, तेव्हां पेशव्यानें आणखी चाळीस लाखांची जाहगीर **मल्हाररावास** करून दिली. हिंदुस्थानांत गोवध फार होई, तो पाहून मल्हारराव फार चिडे. केव्हां यांची एकदां दाणादाण उडवून आपल्या डोळ्यांचें पारणें फेडीन असें तो ह्मणत असे. एकदां एक मेळा लुटला आणि अगणित द्रव्य संपादन केलें. हुमायून

बादशाहाची कबर होती तेथें एक डुकर मारून टांगिलें होतें. तरी मल्हाररावांपुढें मुसलमानांच्यानें कांहींएक करवलें नाहीं. (या साधारण क्षुल्लक गोष्टीवरून त्याचा मुसलमानांस दबदबा फार होता असें दिसतें.) पुढें बाजीराव दक्षिणेंत परतले तेव्हां हिंदुस्थानचा वसूल त्यानें मल्हाररावांकडे सोंपविला. यापुढें त्या वेळच्या कालमानाप्रमाणें लुटालूट होळकरानें फार मांडिली. महमदशाहाची राणी मलीकाजमाना इचा एके वेळीं यानें गोट लुटून दोन लाख रुपये किंमतीची फणी, एक सुंदर रथ वगैरे अजबाब आणिला. तरी मोंगलांच्यानें मल्हाररावाशीं सामना करवेना.

इतक्यांत इकडे महमदशहा यानें, रोहिल्याच्या उपद्रवांतू सोडविण्यासाठीं मराठ्यांची कुमक मागितली, ती मराठ्यांनं दिली. मल्हारराव त्यामध्यें प्रमुख असे. लहानशा सैन्यानिशीं दांडग्या शत्रूंचा पराभव मल्हाररावानें मोठ्या चमत्कारि रीतीनें केला. सशृंग जनावरें आणून त्यांच्या डोक्यांस शिंगा वर मशाली बांधल्या आणि एकीकडे तीं सर्व जनावरें हुसकून दिलीं. दुसरीकडे जंगलच्या झाडाझुडपांना मशाली बांधून आ पण दुसऱ्याच बाजूस गेला. व तेथून शत्रूच्या सैन्यावर मल्हारराव तुटून पडला! शत्रूच्या सैन्यानें, तिहींकडून मशाली दिसत त्या पाहिल्या आणि मनांत आणिलें कीं, आपणांस "गनीमांनीं" चोहोंकडून कोंडलें, आतां येथें निभाव लागणें कठीण, ह्मणून जो तो चीजवस्त सोडून वाट फुटेल तिकडे पळत सुटला! यामुळें मल्हाररावाचें आयतेंच काम जाहलें. चीजवस्त सर्व बुचाटली आणि उत्तम कामगिरी केल्याबद्दल बादशहांकडून उलट बक्षीशी मिळविली!

महमद बादशहानें या उत्तम कामगिरीबद्दल काय मागतां?

मागा, असें ह्मटलें, तेव्हां मल्हारराव हात जोडून ह्मणाला, "मी पेशव्यांचा चाकर. ते माझे धनी. त्यांच्या मुलुखाखेरीज मला दुसरा नको आणि याउप्पर खाविंदाची मर्जीच असेल तर खानदेश जिल्ह्यांतली देशमुखी द्यावी." तें ह्मणणें बादशहानें मान्य केलें !

इतक्यांत इकडे आपली सत्ता अटकेपर्यंत पोंचवावी अशी इच्छा पेशव्यांस जाहली. त्यांना मदत **मल्हाररावा**सारख्यांची; तेव्हां तें काम ह्मणजे फारसें जड होतें असें नव्हे. (त्या धामधुमींत पुष्कळ घोटाळा असून, त्यामुळें पुढें पानिपतचें भयंकर कदन माजलें. ती सर्व हकीकत साकल्य दिली असतां कंटाळवाणी होणार नाहीं असें वाटतें.)

दादासाहेब या हिंदुस्थानच्या मोहिमेवर पुण्याहून रवाना जाहले होते. **भरारी** हें नांव, राघोबास, त्याच्या शौर्यावरून व एकेका दिवसांत मोटमोठाल्या मजला दोन दोन तीन तीन दिवसांच्या मारी, ह्मणून पडलें. मजल दरमजल कुच करीत स्वारी **जाटाच्या** मुलुखापर्यंत आली. जाटानें मराठ्यांचा 'पुण्यप्रताप, अगोदरच ऐकिला होता. आपल्यावर ही टोळधाड आली ह्मणतांच त्या विचाऱ्या **सुरजमलजाटाचें** धाबें दणाणलें ! रूपराम नामक वकीलास राघोबाकडे पाठवून खंडणीचें बोलणें जाटानें लाविलें. राघोबा एक क्रोड रुपये खंडणी मागे तें जाटास पसंत पडेना. तेव्हां "चाळीस लक्ष रुपये देतों ते घेण्यांत यावे नाहीं तर युद्धास उभें राहावें" ह्मणून "पांच गोळे व दारू" जाटानें पाठविली.

तेव्हां राघोबानें कुंभेरीच्या किल्ल्यावर मोर्चे लाविले. दीड महिना गेला. "मोर्चे चालवून सुरुंग लावावे तरी रान रेतीचें. सुरुंगास यत्न नाहीं. तोफ नीच धरली तर गोळा रेतींत जातो.

वर धरली तरी गोळा कुंभेरीचे पार होऊन यांजकडीलच दुसरे मोर्च्यांतील मनुष्यें जाया होतात" असा प्रकार चालला. या झटापटींत मल्हाररावाचा एकुलताएक पुत्र **खंडेराव,** **देवी अहिल्याबाईचा** नवरा गोळी लागून ठार जाहला! त्यामुळें मल्हारराव अतिशयित संतापला. दुःखाला तर पारावार नाहीं. शोक आवरेना! तेव्हां उत्तरकार्य करीत असतां "सुरजमल्ल याचा शिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन तरीच जन्मास आल्याचें सार्थक, नाहीं तर प्राणत्याग करीन" अशी ओंठ चावून मल्हाररावानें प्रतिज्ञा केली.

(अभिमन्युबाळ रणांत पडलेला पाहून जयद्रथवधाबद्दल सव्यसाची धनंजयानें प्रतिज्ञा केली असें पुराणांतरीं आहे. त्याचा इतिहासांत फक्त सव्वाशें वर्षांपूर्वीच अनुभव आला! भगवान् श्रीकृष्ण त्याचा सारथी. वीरश्रेष्ठ अर्जुनाची प्रतिज्ञा या नाटकी सूत्रधारानें भरपूर सहाय्य दिलें ह्मणून सिद्धीस तरी गेली, पण आमचा हा मराठागडी जवानमर्द मल्हारराव पडला एकटा. त्याला सहाय्य करण्याचें राहिलेंच बाजूला, पण आड येण्याचें ब्रीद 'जाणूनबुजून मात्र नव्हे' त्याच्या दोस्तांनीं केलें. स्वामिसेवा चुकूं नये, निमकहरामी पदरीं यावयास नको आणि घरभेद टाळावा ह्मणून मल्हाररावाची प्रतिज्ञा भंग पावली!)

मल्हाररावाची प्रतिज्ञा जाटास कळतांच त्याच्या तोंडचें पाणी पळालें "**मल्हाराव जें बोलेल तें करील यांत संदेह नाहीं**" ही जाटाची समजूत. तेव्हां "आतां गनीम—मराठे—मागतील ते रुपये द्यावे किंवा बायकामुलें यांचा शाका—जिवंत मारणें—करून चालून घेऊन मरावें" अशा विचारांत तो बिचारा पडला. त्याची "स्त्री **हणसया—अनुसया—परम चतुर व**

सुशील होती; तिनें जावसाल केला कीं, यास एक यत्न आहे. राजश्री जयाजीशिंदे सत्क्रियावान् एकवचनी आहेत. त्यांस साध्य केलियास तुमचा तरणोपाय आहे."

ती मसलत सर्वांस पसंत पडली. मनसुबा कायम केला. एके रात्रीं शिंद्याचे डेऱ्यास, सुरजमलजाटाची पगडी घेऊन, वकीलाचा मुलगा आला. आणि बोलिला "आजचे समयीं तुह्मी वडील बंधु आणि मी धाकटा. कळेल त्या रीतीनें बचाव करावा" आणि जाटाची पगडी शिंद्याचे डोकीस घालून शिंद्याची आपणाजवळ घेतली. हिंदुस्थानदेशी रिवाज "पगडीभाई" ह्मणजे प्राण गेला तरी अंतर न देण्याचा. चुकून गोष्ट तर जाह्ली. शिंद्यास मोठें संकट प्राप्त जाह्लें. "याचा पक्ष धरावा तर स्वामिद्रोह पदरीं पडतो आणि मित्रद्रोह पडतो. एकीकडून आड व एकीकडून विहीर. दुतर्फा मरण" जयाजीस आलें. शरण आलियासि मरण देऊं नयें, हा शूराचा धर्म. तो ध्यानीं आणून सुरजमल याजला अभयपत्र व बेलभंडारा विश्वासाचा, किल्ल्यांत पाठविला. हें वर्तमान मल्हाररावास कळतांच त्याच्या तळपायांची आग मस्तकाला चढली. तिडकीसरशीं मल्हारराव, दादाकडे गेला आणि "आमचे अस्तनींत अग्न आणि जाट हस्तगत कैसा होतो ? जाट व शिंदे पगडीभाई जाह्ले." असें बोलला. तेव्हां "शिंदे यांजकडून अशी गोष्ट घडावयाची नाहीं. घडली असलीयासी साहेबांचें अनहित करणार नाहींत." अशी सर्वांची खातरजमा जाह्ली.

मराठे कुंभेरीवर निकरानें मारा करूं लागले. तेव्हां जाट यांस "दम पुरेना" "ह्मणून अजून निर्वाण कोठवर पहाल? सल्ला करणें अथवा हल्ला करून मारून टाकणें" असा निरोप शिंद्यास जाटाचा आला. तेव्हां जयाजीराव शिंदे दादासाहेबांकडे

गेले आणि बोलिले "दादासाहेब ! आह्मी धणियाचे बारगी
निमकहराम नहों. आह्मी जाबसाल सांगतों तो खाविंदां
मर्जीस येत नाहीं. आजचे समयीं जाटापाशीं खंडणी घेऊ
पुढें मसलत फत्ते करावी. एक जागीं राहिल्यास, पदरीं फौ
भारी, निभावणी होणें कठीण." तें ऐकून दादासाहेबांस मो
काळजी पडली. शिंदे, होळकर, सरकारचे दोन हात. को
त्याही हाताला इजा होतां कामा नये. असें संकट पडलें. का
करावें हा विचार सुचेना.

इतक्यांत मारवाडांतील राजे रजपूत रामसिंग विजेसिंग अ
आपसांत भांडत होते. रामसिंगाला थारा कोणाचा नसे ह्मणू
त्यानें नेकजात–सत्यप्रतिज्ञ–**शिंदे जयाजीराव** आहेत त्यांस शर
जावें असा निश्चय केला आणि "आह्मी राजे दुर्बळ ह्मणून तु
ह्मांस शरण आलों" असें सांगून पगडीभाई केली.

हें जयाजीच्या पथ्यावर पडलें. ते दादासाहेबांकडे जाऊ
बोलले "तुह्मी थोर खाविंद आहां. आपण या स्थळीं राहू
जाटाचें पारिपत्य करावें. आह्मांस आज्ञा द्यावी. मारवाडप्रां
जाऊन मसलत फत्ते करतों. सर्वांनीं एक जागां राहून मसल
बुडवावी हें टीक नाहीं. पदरीं फौज भारी त्रास काय द्यावें
धणी यांनीं खुषी रजावंतीनें निरोप दिला तर उत्तम आ
नाहीं तर आपणांस साफ राहतां पुरवत नाहीं." आणि लगे
आपल्या सैन्यास कुचाची इषारत दिली !

दादासाहेबांला संकट भारी पडलें ! थोरपणा ह्मटला ह्मण
असा असतो. यास्तव "लहानपण देगा देवा" असें संसा
रहस्य पूर्णपणें जाणून विरक्तता मिळविलेले ह्मणतात तें का
खोटें नाहीं. "ऐरावती रत्न थोर त्यासी अंकूशाचा मार"
गोष्ट खरी आहे. शिंद्याचें ह्मणणें मान्य करावें तर होळ

रागावतो. होळकराचा पक्ष धरावा तर शिंदे रागावून चालले! काय करावें त्या बिचाऱ्यानें?

होळकराचे डेऱ्यास बोलावणें पाठविलें आणि मल्हारराव ये-तांच केवळ अजीन होऊन दादा होळकरांस बोलले "शिंदे तों कुच करून चालले. तुह्मी वडील आहां. आह्मांस मनसबा कोणता देतां?" त्यावेळची मल्हाररावाची स्थिति काय सांगावी? प्रतिज्ञेचा भंग ह्मणजे अर्थात् निर्वाणसमय. शिंदे मित्र; त्यांची ही कृति. पेशवे मायबाप सरकार; त्यांचा आपल्यावर असा हा सर्व भार पडलेला; तेव्हां क्षणमात्र तो दंग होऊन गेला. कांहीं-एक त्याला सुचेना. पण मल्हारराव जवानमर्द मराठा गडी, अभिमानाचा धड, स्वामिसेवक पहिल्याप्रतीचा, मनसबेदार पटाईत, चाणाक्ष मोठा, धोरणी फार; तेव्हां आपण दुराग्रह धरून अपयशाचें खापर कां आपल्या डोक्यावर फोडून घ्यावें? न ऐकावें तरी मसलत बुडते. आजच जाट कोठें जातो असें नाहीं; तर प्रसंग साधून घेतला पाहिजे ह्मणून त्यानें विचार केला आणि राघोबास उत्तर केलें "तुह्मी खावंद आहां. ज्यांत धन्याची मर्जी त्यास आह्मी राजी." ही पडत्याफळाची आज्ञा राघोबास हवी होती. शिंद्यांस बोलावूं पाठविलें आणि त्यांच्या हातीं साठलक्ष रुपये खंडणी घेऊन जाटाचा तह करविला! होळकर माळव्यांत परतले, शिंदे मारवाडावर गेले. अशा रीतीनें होळकराची प्रतिज्ञा शिंद्यानें भंग केली. ती जाणूनबुजून जाहली नाहीं एवढाच संतोष. असो.

इकडे शिंदे रजपूतांशीं लढावयास गेले. रजपूत ह्मणजे साऱ्या दुनयेंतली कडवी शूर जात. "मारवाडप्रांतीं दस्तूर हाच कीं समूर घाव घेतला तरी उत्तम, नाहीं तरी पुरुषांचें स्त्रियांनीं मुखावलोकन करूं नये. रजपूत स्त्रियांची हिम्मत या री-

तीची, तेथें पुरुषांची शिफारस कोठवर लिहावी?" पण अशा लोकांशीं मराठ्यांनीं लढाई दिली. तीन भूपतींना सामान सुमान घेऊन पळावयास आपा शिंद्यानें लाविलें; श्रीशिव छत्रपतीनें चार बादशाही बुडविल्या! असे एकापेक्षां एक जवानमर्द मराठे गडी आपल्या देशांत जन्मले! खचित ही महाराष्ट्रभू अजब रत्नांची खाण! तिच्यांत कसकसलालीं रत्नें पैदा जाहलीं, हें पाहिलें ह्मणजे मन थक्क होऊन जातें. पण अलीकडे त्याच खाणींतून अस्सल गारगोट्या निघताहेत हें त्या खाणीचें दुर्दैव!

जयाप्पानें आपली अपूर्व मर्दुमकी रजपुतांस दाखविली खरी; तरी अखेर त्या शूर मर्द रजपुतांनीं अगदीं नीच भागूबाईचें कृत्य केलें. मारेकरी घालून स्नान करितांना अप्पाला ठार मारविलें! हें वर्तमान कळतांच मल्हारराव फार फार कष्टी जाहला. "आमचें जूग विस्कळित जाहलें" हा मल्हाररावांचा उद्गार "बाह्यार्थ," असा शेरा दिंडोऱ्याचे गुमास्ते कृष्णाजी शामराव आपल्या बखरींत देतात तो केवळ अयथार्थ आहे. कारण दत्ताजी व जनकोजी शिंदे हे चांभारगोंद्यास गेले तेवेळीं "घरास जाऊन समाधान करावें" अशा रदबदल्या होळकरानें पुष्कळ घातल्या तुमची "भेट स्वर्गीं" असा जाब मल्हाररावास मिळाला; पण शिंद्याकडील त्याचा ओढा कमी जाहला नाहीं. तरी, पुढें "शिंदे यांची जन्माची सांगड होती. कित्येक कामें असाध्य तीं साध्य होतीं; जनकोजी शिंदे यांस भेटून त्यांचे चित्तांतील मळ काढावा" असा विचार शिंद्याच्या पदरच्या गंगाधर तात्यापाशीं मल्हारराव करतो. तेव्हां आप्पा मेल्याचें दुःख "बाह्यार्थ" खचित नसावें. अस्तु.

पुढें राघोबादादा आणि मल्हारराव हे उभयतां मातब

सैन्य घेऊन पंजाबाकडे गेले आणि लाहोर सर केलें. "कृष्णातीरच्या घोड्यास सिंधूनदाचें पाणी" मल्हाररावानें पाजलें खरें! अटकेवर झेंडा लाविण्याचें महत्कार्य याच मर्दानें पार पाडलें! मल्हाररावानें आपली मर्दुमकी अटकेपर्यंत गाजविली; भगवा झेंडा हिमालयावर नेला; मराठे ह्मणतांच थरकांप कडव्या मुसलमानांस सुटावा असे अनेक प्रताप गाजविले. मर्द शिपायी होळकर खरा; त्याच्या शौर्याचें वर्णन करावयास, अर्जुनाचें युद्धकौशल्य वर्णन करणारा साक्षात् व्यासोनारायणच पुनः अवतरावयास हवा. इतरांस साध्य नव्हे.

होळकराची ही मोहिम फत्ते जाहली. तेव्हां खुद्द शिंद्यानें—जनकोजीनें—विचारिलें "सुभेदार, तुह्मी आह्मांस वडील आहां. तुह्मीं अटकेपावेतों मुलुख काबीज केला. आतां आह्मांस मोहिमेस राज्य कोणतें?" शिंद्याची भेट व्यावी ह्मणून पुष्कळ रदबदल्या मल्हाररावानें केल्या; "स्वर्गीं भेट होईल" "आपल्या बंधूच्या पश्चात् भेटावयास पुरवत नाहीं" वगैरे निरोप शिंद्याकडून होळकरास आले, तरी ते न जुमानतां "मूल आहे" ह्मणून आपली समजूत केली आणि होळकर, शिंद्यास भेटावयास, मानापमानाची पर्वा न करितां निघाले! भेटी जाहल्या. त्यावेळीं शिंद्यानें हा प्रश्न केला. शिकंदर आपणांस राज्य जिंकावयास उरलें नाहीं ह्मणून विषण्ण होत्साता दुःखी जाहला तसाच प्रकार या शिंद्याचा. शिंद्याच्या प्रश्नास मल्हाररावानें उत्तर दिलें "तुह्मांस एक राज्य आहे. भागीरथीस पूल बांधून अयोध्येवर जावें. नजीबखानाकडून हें काम करवावें" शिंदे बोलले "नजीबखान रोहिला मात्रागमनी. जन्मस्थानीं लघुशंका करणार. तो खाविंदांचा द्रोही." कारण मागें राघोबानें "नजीबखान याचा शिरच्छेद केलिया आह्मांस तुमची

सर्व जोड पावली'' असें शिंद्यास सांगितलें होतें. पण त्याच नजीब उद्‌वल्यास "धर्म पुत्र'' असें मल्हाररावानें, "माझा बचाव करावा'' ह्मणून, तो शरण आला त्यावेळीं ह्मटलें, त्याचा हा अभिमान.

राघोबा पुनः पुनः ह्मणे "क्रोड रुपये शिबंदी वाढली तरी देऊं, परंतु नजीबखान रोहिला याचें पारिपत्य करून त्यास जिवें न सोडावें. आह्मींच पारिपत्य केलें असतें. परंतु तो मल्हाररावाचा धर्म पुत्र.'' राघोबा आणखी वारंवार ह्मणे "मल्हाररावांस पुत्र बहुत. माधवसिंग जयनगरकर, विजेसिंग मारवाडी, त्यांत हा नजीबखानही पुत्र जाहला आहे. त्यांचे जितके धर्मपुत्र तितके मात्रागमनी.'' शिंद्यानें नजीबखानाचें पारिपत्य करण्याचें पत्करिलें होतेंच. तें करूं नको असें मल्हारराव ह्मणे, मल्हारराव शिंद्यास ह्मणाला "बाबा! तुमचा मूल—स्वभाव, अटकेपासून रामेश्वरापर्यंत एकछत्री राज्य जाहलें. हिंदुस्थानांत एक नजीबखान राहिला आहे. त्याचें पारिपत्य केलिया अटकेपासून पेशवे जासुदांहातून पैसा आणवतील. मग तुह्मी आह्मी सहज निर्माल्यवत् जाहलों. तुह्मांस पेशवे धोत्रें बडवावयास लावतील'' ह्मणजे मंथरेचें थोडेंबहुत काम मल्हाररावानें याप्रसंगीं केलें ह्मणावयास हरकत नाहीं!

मल्हारराव आपल्या प्रांतीं असत त्यासमयीं जयनगराशीं त्यांचा शह होता. शिंदे अयोध्येकडे गिलच्यांच्या कच्चाटींत सांपडले. त्यांच्या सैन्याची भयंकर दाणादाण जाहली ह्मणून निकडीचीं पत्रें होळकरास आलीं. तीं पाहून मल्हाररावानें शह उठविला. सैन्यासहवर्तमान शिंद्याचा पाठपुरावा करण्याची जय्यत तयारी मल्हाररावानें केली. वाटेंत पळून आलेलें शिंद्याचें सैन्य भेटलें. दत्ताजीचा शिरच्छेद जाहला; जनकोजी फा

घायाळ होऊन बायकापोरांनिशीं गिरिदरींत पडले. त्यांचा मुक्काम तीन कोसांवर आहे असें ऐकिलें, तेव्हां मल्हाररावास फार वाईट वाटलें. अंधारींतच शोक करूं लागले. त्यांचें अवसानच खचलें. तो शोक पाहून गौतमीबाई आपल्या नवऱ्यास—मल्हाररावास—ह्मणाली "सुभेदार ! तुमचें वृद्धपण जाहलें. शिंदे यांचीं मुलें ह्मणजे काय ? त्यांचें तोंडचें जार वाळलें नाहीं. त्यांनीं एवढा पराक्रम करून मारतां मारतां मेले. एरवीं हा मृत्युलोकच आहे. जाला प्राणी वांचत नाहीं. परंतु इहलोकीं कीर्ति करून परलोक साधन करणें दुर्घट. हें मूल जनकोजी शिंदा याणें पराक्रम केवढा केला. तुमचे दिवस समीप आले. तरी हिंमत धरून मारतां मारतां मरावें. प्रलाप स्त्रीजातीनें करावा. प्रस्तुत जवळ जखमी व मुलेंबाळें आले आहेत तर ऐसेंच जाऊन भेटून त्यांचें समाधान करावें." हें भाषण ऐकून मल्हारराव चिडले आणि आपल्या स्त्रीस टाकून बोलले "तुमचे चित्तांत आह्मीं मरावें असें आहे." यावर गौतमीबाईनें उत्तर दिलें "सुवासीण असतां वैधव्याची आस्था धरील अशी कोण चांडाळीण असेल ? अहेवपणें हळदकुंकुममंडित मरावें; आपले पदरीं लौलिक भारी. आपलें घोंगडी विणावयाचें स्वकर्म करीत असतां तरी सहजच वांचावयाची आस्था धरावी. बाण सतीचें घेतलें तैसें चालावें." हें उत्तर किती बाणेदार हें का सांगावयास हवें ? हल्लींच्या महिला पाहिल्या ह्मणजे काय वाटेल बरें ? "जांवई काळ्या पाण्यावर गेला तरी पत्करला" ह्मणणाऱ्या पंडिता सास्वांच्या तालमेंत तयार जाहलेल्या "शारदा" इतपत "संमतीवयाखातर" कदाचित् निधड्या बनतील तर न जाणो !

बायकोच्या वचनानें संतापलेला मल्हारराव तसाच पुढें शिंद्यास भेटावयाला गेला. तेथला आक्रांत काय विचारावयाचा

आहे ! झाडांस वस्त्रें गुंडाळून राणीवशांतल्या बायका बस-लेल्या ! ना अन्न, ना वस्त्र, ना पांघरूण. तो प्रकार पाहून मल्हाररावाचा शोक अनावर जाहला. तावडतोब डेरे, राउट्या आणवून प्रथम जिकडली तिकडे व्यवस्था केली. पुढें काय करावयाचें हें निश्चित ठरविलें. इतक्यांत दुराणीची फौज पुनः चाल करून या मंडळीवर आली. मल्हाररावानें सांगितलें "बाबा ! तुह्मी जखमी आहां. दुराणीची दौड भारी. सहजीं चालणें चाळीस कोस. त्यांत तुमची निभावणी पडणार नाहीं. यास्तव बुणगे व बायकांसुद्धां चमेल पार व्हा" त्याला शिंद्या जनकोजीनें उत्तर दिलें "सुभेदार, तुह्मी वडील आहां. मुलेंमाणसें व बुणगे घेऊन जावें, माझा नेमच आहे कीं, जेथें पाटील पडले त्या ठिकाणीं देह टाकावा. आपल्यास राहणें नाहीं." काय ह्या आमच्या जवानमर्द गड्यांच्या काटकपणाची आणि स्वाभिमानाची कमाल ही !! त्यांची समजूत करण्याचा मल्हाररावानें पुष्कळ यत्न केला पण सर्व व्यर्थ. जनकोजीच्या ह्मणण्यास मल्हारराव रुकार देणार होते. पण घरीं आल्यावर **गौतमीबाईनें** पुनः बरीच कानउघाडणी केली. ती बोलली "अपकीर्ति मिळवून किती पन्नाशा जगणें आहे ? बहुत रोज गुदरले, थोडके राहिले आहेत. जनकोजी शिंदे मूल. त्याची एवढी हिंमत ! आणि तुह्मीं हा काय ह्मणोन विचार मनांत आणिलात ?" तेव्हां दुसरे दिवशीं जनकोजीस मल्हाररावानें सांगितलें कीं, तुह्मी आह्मी सर्वत्र फौजेंत राहूं. बायकामुलें माळव्यांत पाठवून द्यावीं. मग तसेच गिलच्यावर शिंदे होळकर चालून गेले. "मल्हारराव व जनकोजी शिंदे यांनीं कुच करून मारवाडप्रांतास गेले. तों दुराणीनें पाठलाग केला; गिलचे तिकडे येतांच पाणिपत कर्नाळ इकडे गेले. मोंगल तिकडे येतांच गनीम दिल्लीस पोंचले. तेथें

येतांच आगरियास आले. तेथें येतांच जयनगर प्रातांत गेले; तिकडे दौड पोंचतांच उदेपूरचे सुमारें गेले." असा पुष्कळ गनीमी कावा केला. पण उपयोगीं पडेना. अशा रीतीनें दमवून मग हल्ला करावा हा बेत होळकराचा, तो सिद्धीस गेला नाहीं. उलट आपणच फार दमले. अंतरवेदप्रांतीं शिकंदर शहर लुटून फस्त केलें, पण लूट नेतां येईना. लष्कर सर्व सडें. खावयाप्यावयाची मात्र चंगळ उडाली. तेथें शिमगी पूर्णिमा आली. सण चांगला साजरा केला. धुळवड यथेच्छ खेळले. इतक्यांत "दुराणीची फौज यमुना उतरून अंतरवेद प्रांतें तुह्मांवर आले. देखतचिठ्ठी पलायन करावें." अशी सुरजमल्ल जाटाची चिठ्ठी आली. सैन्य पळूं लागलें. शिंद्याच्या सैन्यानें एकवार अबदालीशीं झुजून खस्त खाल्ली होती. त्यांना त्यांचें सामर्थ्य माहीत. होळकराच्या सैन्याची तशी गोष्ट नव्हती. त्याचा दम ताजा होता. शिंद्याचें सैन्य पळतें ह्मणून ते हांसत. "दुराणी केवळ अस्मान फोडून आला नाहीं. आह्मी तुमचे आवाईवर पळतों. कोठवर पळावें ?" असें वारंवार होळकराच्या सैन्यांतले लोक बोलत तें जनकोजीच्या कानीं गेलें. त्यांनीं होळकरास ह्मटलें "सुभेदार, तुह्मीं एकवेळ युद्ध करणें; आह्मांस आज्ञा देणें. आह्मी तुमचे फौजेंत राहिल्यास उत्तम नाहीं." त्याला मल्हारराव बोलले, तें कांहीं नाहीं; उभयतां मिळून युद्ध केलें पाहिजे. या गनीमाची खोडकी मोडली पाहिजे. जनकोजी ह्मणाले "आमचे लोकांनीं धास्त खाल्ली आहे. दुराणी आलियावरी झाडास बांधले असतां झाडच घेऊन जातील." मग निरुपायानें सुभेदार मल्हाररावास तें बोलणें मान्य करावें लागलें. पण मनांत खात्री कीं, शिंद्याचें असलें लढतें सैन्य तें हातटेंकीस आलें. हिंदुस्थानीं शिपाई, त्यांची ही अवस्था; आपली खान-

देशी मंडळी ती कितीवेळ टिकाव धरील हें त्याला कळलें होतें. आणि पुढें तसें प्रत्ययासही आलें. मूल जनकोजी चालला तेव्हां सुभेदारास जास्तच ईर्षा आली. यमुना पार कसें व्हावें याची सल्ला जाटाचा वकील रूपराम याला विचारिली तेव्हां "डोखरे—थेरड्या—रोताहै क्यौं?" अशा प्रकारचा बेजा जवाब मल्हाररावास मिळाला. तेव्हां स्वतः नदीचा ठाव उतारासाठीं पाहूं लागले. दुसरे दिवशीं नदी उतरून सैन्य पार जाहलें. होळकराच्या सैन्याची व दुराणीची गांठ पडली. एकवेळ झुंजावें ही होळकराच्या सैन्याची खुमखुम जिरूं लागली. दुराणी आटोपेना. आपला नेहमींचा पळून जाण्याचा कावा मराठ्यांनीं केला. तों दुराणी पाठलाग करून डोकीं कापित सुटले. हजार डोचकीं गनीमांचीं दुराण्यानें उडविलीं. दे माय धरणी ठाय अशी गत होळकराच्या सैन्यास जाहली. दांतीं तृण धरून शरण आलों ह्मटलें तरी अर्बुदजात दुराणीची; ती तें ऐकेना. महिपतराव, होळकराचा दिवाण, त्याचें शिर गिलच्यांनीं कापून नेलें. होळकर स्वतः लढाईत नव्हते, चौघांकडे युद्धाचें काम सोंपवून राहिले होते. त्यांस हें वर्तमान कळल्यावर बहुत कष्टी जाहले. आपला बचाव करण्याची त्यांला पंचाईत पडली !

इकडील प्रसंगांचीं पत्रें पेशव्यांस जात; पण तिकडे हैदराबादकरांशीं कटकटी सुरू जाहलेल्या. इकडे सैन्य पाठविण्याची सवड नव्हती. शिवाय शिंदे होळकर ह्मणजे हिंदुस्थानचे सिंह, त्यांना फत्ते मिळावयाचीच; अशा समजुतीवर तिकडे स्वस्थ बसले. होळकरांच्या सैन्याची ही जेव्हां धूळधाण उडाली, हें वर्तमान कळतांच मात्र त्यांस वाटलें कीं, आतां गम खातां कामा नये. तांदुळज्याच्या लढाईत नुक्तीच फत्ते मिळाली त्या आनंदांत गर्क होते. जनकोजी आणि मल्हारराव यांचीं सार्वत-

पत्रें गेलीं. सदाशिवराव भाऊ त्या वेळीं पुण्यास कुलकारभारी. तो ताज्या दमाचा गडी. फत्ते नुक्तीच मिळविलेली. जवळ बळवंतराव मेहेंदळे वगैरे मंडळी वरीच उल्लू आणि छन्नी असे. पोक्तपणा त्यांत कोणासच नव्हता.

हिंदुस्थानाकडचें साकल्य वृत्त ऐकून भाऊ मनस्वीच कष्टावले. मेहेंदळे बळवंतराव, खाजगीवाले गोविंदराव ही दुक्कल भाऊसाहेबांचें समाधान करूं लागली ! बिचाऱ्यांची कल्पना ह्मणजे मोठी दुष्ट. सारासार विचार नाहीं. "शिंदे होळकर यांनीं त्या राज्यांतील बहुत दिवस सौख्य अनुभवलें. स्वामिकार्याची नुकसानी केली." आतां खासा स्वारी हिंदुस्थानावर जावी ह्मणजे सर्वांची चांगली खातरजमा होईल; अशा प्रकारचीं भाषणें केलीं. शिंदे होळकरांचा गर्व परिहार केला पाहिजे; तुह्मांपुढें ते दोघेही कस्पटें. त्यांच्यावर आपला दाब बसविला पाहिजे वगैरे सल्ला दिली ! पुढें हिंदुस्थानांत मोहिमेवर जाण्याचा बेत ठरला. दादासाहेब अनुभवलेला पोक्त योद्धा. तो बरोबर खजीना मागतो हें बरोबर नाहीं असें भाऊंनीं ठरवून स्वतः चालून जाण्याची तयारी केली. आपण येतों वगैरे वर्तमान शिंदे होळकरांस कळविलें नाहीं. बळवंतराव मेहेंदळे वगैरे सल्लामसलतगार या मोहिमेंत होते. माळव्यांत पुण्याहून निघालेल्या सैन्याचा तळ पडला. तेथून मात्र होळकरास पत्र लिहिलें आणि विचारिलें; काय ? तर "आह्मीं मजल दरमजल यावें कीं दम खातखात यावें ?"! हें पत्र पाहून मल्हाररावास वाटलें "हे थोर खावंद असतां यांणीं ठिकाणीं राहूनच फौजेचा पुरावा करावयाचा होता. भाऊसाहेब कर्ते मनुष्य, ते निघोन आले तेव्हां साऱ्या गोष्टी यांतच आटोपल्या. नानासाहेबांस पाठपुरावा करण्याची हिंमत होणार नाहीं" आणि लगेच

पत्राचें उत्तर लिहिलें कीं "आधींच न यावें. ज्यांनीं मनसबा दिला ते थोर आहेत. दुराणी कांहीं सामान्य नाहींत. यास्तव मोहरा इरेस पाडावा असा अर्थ नाहीं. साहेबीं माळवेप्रांतीं राहून छावणी करावी. पुढें फौज मात्र सडी रवाना करावी. आह्मी साहेबांचे दमावरीच कार्य उरकोन घेतों." असें पत्र शिपाई मुत्सद्दी बाण्याचें होळकरानें लिहिलें खरें; पण बळवंतराव मेहेंदळा कसल्या अगाध बुद्धीचा! त्यानें या पत्राचा अर्थ भाऊसाहेबांला फोडून सांगितला कीं "भाऊसाहेब! शिंदे होळकर यांणीं या राज्यांत बहुत दिवस क्रमून राजे जाहले. त्यांस आह्मी आलियाचें सुख काय आहे?" सरळबुद्धीचा प्राणी बिचारा! आपल्या मित्राची ही सल्ला भाऊस पसंत पडली आणि ते पुढें तडख निघाले. ढोलपुरावर आले; चमेलीघांट उतरावयाचा राहिला ह्मणून पुनः होळकरास पत्र लिहिलें कीं, "दोलपुराचें घांटें उतरावें किंवा अचेरीकडून यावें याचा निश्चय करून पाठविणें." हें पत्र पाहतांच मल्हाररावास फार कोप आला आणि "तुह्मांस माळवेप्रांतीं छावणीस राहवें ह्मणून लिहिलें असतां येथपावेतों यावयास कारण काय? तस्मात् सर्व सभोंवताले नूतनवय मिळाले ते तुमचे हिताचे आणि आह्मी वृद्ध, आमची साठीची बुद्धि नाठी जाहली. आह्मीं आजपर्यंत जितकें कर्म केलें तितकें साहेबांचें अनहित केलें, आतां सर्व मिळून स्वहित करावें" असें पत्र लिहिलें. सुभेदार नेकजात इमानी सरदार, त्याला हे पोरढंग कसे आवडतील? खरेपणा, इमान, पोक्तबुद्धि आणि कर्तृत्वशक्ति असेल तरच धन्याला अशीं पत्रें लिहवतात; एरवीं कोणाची प्राज्ञा नाहीं. मल्हाररावाच्या या सणसणीत पत्रानें तरी भाऊसाहेबांचे डोळे उघडावयाचे होते! पण नाहीं. सर्व महाराष्ट्र देशाचा घात व्हा-

वयाचा होता. मेहेंदळ्यास विषकल्पनांनीं "ब्रह्मपाछाई" मिर-वावयाची होती. तेथें कोणाचा इलाज चालणार आहे ? विठ्ठल शिवदेव यानेंही मल्हाररावाचें ह्मणणें बरोबर आहे, तसेंच वागावें; असें समक्ष व साफ सांगितलें तरी त्याची भाऊंस परवा वाटली नाहीं. मेहेंदळ्यांनीं त्यास ही कोटी लढविलीच! खरा स्वामिसेवक बापडा! भाऊंनीं आपला रोख पुढें चालविलाच. गंभीरा नदीवर सर्व सैन्य उतरलें. शिंदे होळकर भेटावयास गेले "ते समयीं मल्हारराव यांनीं भाऊंची मर्यादा कांहीं धरली नाहीं; भरले सभेंत गर्जों लागला कीं" "भाऊसाहेब! तुह्मांस नदीपार राहवें ह्मणून लिहिलें, यावयास कारण काय? चार भों-वताले मिळाले ते केवळ बेवकूब आहेत. एवढा मोहरा आ-णून इरेस घातला. आतां काढावयास यत्न नाहीं. ह्मणून बहुत गालिप्रदानें केलीं" कोणी चकार बोलेना! बोलणार कसें आणि कोण?

सुरजमल्ल जाट ऐन प्रसंगीं उपयोगीं पडेल ह्मणून पूर्वीचा सर्व द्वेष सोडून त्याचा होळकरानें स्नेह संपादला होता. जाटाला आपल्या गोटांतसुद्धां आणिलें. परंतु बळवंतरावाच्या हातीं यक्षिणीची कांडी होती. भाऊसाहेबांस रोज कानमंत्र मेहेंद-ळ्याचा. सुरजमल्ल जाटाचा उघड उघड अपमान बोलण्यांत आणि कृतींत करूं लागले. सुरजमल्ल जाट यालाच कैद कर-ण्याचा घाट बळवंतरावांनीं घातला. होळकर शिंद्यांनीं इमान देऊन त्यांस आणिलें. तें कांहीं घरांतल्या लग्नादि कार्याक-रितां नव्हे. पेशवे सरकारची फत्ते व्हावी ह्मणूनच; आणि त्याच जाटाला भाऊसाहेब होळकरासमक्ष ह्मणतात "आह्मीं दक्षिण सोडून तुमचे बळावर आलों नाहीं. तुह्मीं राहवेल तर राहवें." हा "पानिपतचा मोहरा!"

पुढें होळकर शिंद्यांनीं रातोरात जाटास पळून जाण्याची सल्ला दिली, कारण बळवंतरावानें कैद करण्याचा घाट घातला होता. रातोरात जाट निघून गेला. मग तासाभरानें होळकर शिंदे "जाट पळाला धरा! धरा! पकडा! पकडा!" ह्मणून रेंगाळत रेंगाळत पाठलाग करावयास गेले! काय करणार बिचारे? असले स्वामी असल्यावर इमानी नौकरांचा हाच कावा. यांत दोष स्वामीकडे; सेवकाकडे नाहीं. जाट गेल्यावर कुंजपुऱ्यावर भाऊंनीं हल्ला केला. मल्हारराव ह्मणत, शत्रू पलीकडे आहे. आपलें सैन्य कां दमवावें? पण भाऊंस "ग"ची बाधा जाहलेली. ते कोणाचें ऐकेनात. सुदैवानें कुतुबशहा मराठ्यांच्या हातीं लागला. मागें; सैन्याचा पराभव, दत्ताजीचा शिरच्छेद, केला ती हीच स्वारी. तेव्हां भाऊसाहेबांस असला दुष्मन हातीं लागल्यावर संताप खूप चढला व संतोष बहुत जाहला तर नवल कोणतें? त्यास भाऊंनीं यथेच्छ गालिप्रदानें दिलीं. हत्तीवरून लोटा ह्मटलें. कुतुबशहानें हात जोडून भाऊंस विनंति केली "सल्ला करावयाची तर मला वांचवा. युद्ध करावयाचें तर खंडणी घेऊन सोडा. पंधराव्या दिवशीं तुमच्याशीं लढतों. हवे असल्यास पन्नास लक्ष रुपये रोख देतों" पण भाऊ ह्मणाले "दत्ताजीचा शिरच्छेद केला कीं काय?" त्यास होय ह्मणून कुतुबशहानें उत्तर दिलें. पण भाऊसाहेबांचा क्रोधसागर खवळलेला. याचा शिरच्छेद करा ह्मणोन त्रिवार गर्जले! होळकर हात जोडून ह्मणाले, "यास वांचवून महत्कार्य संपादून घ्यावें" तरी शिरच्छेद करावा ह्मणून पुनः ओरडले. यावेळीं भाऊंस संताप चढला तो कांहीं विचारतां सोय नाहीं. मरतांना मला पाणी तरी द्यारे ह्मणून कुतुबशहा काकुळतीस येऊन बोलला. त्याला भ ाले "मात्रागमनीस लघुशंका पाजा." क्षात्रधर्मापुढें ब्रह्म-

तेज पहा कसें फिक्कें पडलें तें ? मागें दत्ताजी रणांत पडला हें ऐकून कुतुबशहा, धांवत त्याजवळ आला. त्यानें "पटेल, हमारे साथ तुम् और लढेंगे ? असा प्रश्न केला, त्याला "इनशाहाखानाला ! बचेंगे तो औरबी लढेंगे." असा दत्ताजीनें जाबसाल दिला ! तेव्हां "कुतुबशहानें कमरेचा सुरा ओढून लाथेनें ढकलून पालथा घालून दत्ताजी शिंदे यांचा शिरच्छेद केला" ! आणि तोही, दत्ताजीचा चोपदार राजाराम आपल्या धन्यास बाहेर सुरक्षित न्यावें ह्मणून पूर्वीचा स्नेह जाणून साहाय्यास गेला तेव्हां. या गोष्टी ध्यानांत धरिल्या ह्मणजे भाऊंनीं हा सुरेख सूड घेतला असें वाटतें. पण वेळ पाहिली नाहीं, एवढाच काय तो अपराध.

अशा प्रकारें कुंजपुऱ्यावर फत्ते मिळतांच भाऊसाहेबांना आणि त्यांचे मुख्य ( कान )मंत्री बळवंतराव मेहेंदळे यांस स्वर्ग केवळ दोन बोटें आहे असें वाटलें. शिंदे होळकरांची हुलकावणी असें बोलूं लागले. तोंच होळकरांनीं अर्ज केला "साहेबीं महत्कार्य करून यश संपादिलें. आतां कुच करून दिल्लीस जावें यांत उत्तम आहे" परंतु बळवंतराव यांची जिव्हा लवलव करूं लागली. मेहेंदळे ह्मणाले "सुभेदार ! तुमचे आंगांत दुराणीचें शाहारें कां शिरलें ? अद्याप तुमचें भय कां जाईना ?" हें ऐकून मल्हाररावास काय वाटलें असेल, याची कल्पना सहजच होण्यासारखी आहे. "तो स्पष्टवक्ता; त्यास कोणाची परवा नाहीं; आणि आंगीं कृत्रिमही नव्हतें." त्यांनीं भीड सोडून भाषण केलें आणि गर्जले "तुह्मी ब्राह्मण जात निर्बळ ! कांहीं आकाश फोडून आलां नाहीं. पंचाननाची गांठ पडली नाहीं तोंच वल्गना करितां" ह्या त्याच्या भाषणाचा अर्थ बळवंतरावानें "अबदालीकडे फितूरी" असा दिला.

कुंजपुऱ्यांत असा हा गनीमांनीं पराभव केला तें ऐकतांच दुराणी

यमुना उतरून मोठ्या त्वेषानें मराठ्यांवर चालून आला. इकडे मराठे बेसावध होते. अशी एकदम धांदल पाहतांच होळकरास भाऊनें विचारिलें, पुढें मनसुबा कोणता ? "हा विचार बळवंतरावास विचारा, आह्मांस सुचत नाहीं. साठी बुद्धि नाठी" असें ह्मणून मल्हाररावानें कानावर हात ठेविले! ह्मणजे इतउत्तर भाऊसाहेबांशीं होळकर सडेतुडीनें वागे. पुढें पानपतचें भयंकर रणकंदन माजलें; भाऊ कोणाचा सल्ला मनास आणिनात. उपासमार होऊं लागली, तेव्हां, गिलच्यांवर मराठे तुटून पडले. आज उद्यां दोनदिवस राहून लढाई द्यावी ही सल्ला होळकर द्यावयास गेला, तेव्हां "धनगराची सल्ला" ह्मणून भाऊनें झिडकारिलें. पदोपदीं मल्हाररावाचा असा भाऊनें उपमर्द केला. भाऊ ह्मणजे मल्हाररावापुढें केवळ कालचा पोर. पण तो धनी. त्याचा मान राखिला पाहिजे. स्वामिसेवेंत अंतर पडतां कामा नये ह्मणून अखेरपर्यंत विचारा ह्मातारा मल्हारराव धडपडे. अखेर मातबर झुंज जाहलें. सदाशिवराव ठार जाहले. भाऊ जिवावर उदार "डुक्कर खळीस येतो तसे गर्दींत घुसले." जिकडून तिकडून सैन्य पळतच सुटे तेव्हां निरुपायास्तव अवघ्या पंचवीस स्वारांनिशीं लष्करांतून मल्हाररावानें पळता पाय काढला.

शूरपणाला ही गोष्ट लांछनास्पद खरी. परंतु भाऊचा हट्ट, होळकरांच्या मर्जीविरुद्ध, प्रत्येक गोष्टींत जाऊन मसलत बिघडविणें, या असल्या अनेक कृत्यांमुळें होळकराचें मन उदास जाहलें होतें. सेवाचोर होऊं नये ह्मणून आपली शर्थ मल्हाररावानें करून सोडिली; पण त्याचा अखेर उपाय थकला. तेव्हां रणांतून मल्हारराव मुकाट्यानें परतला. मराठ्यांचा कावाच हा कीं, दम निघेल तोंवर तोंड द्यावें; नाहीं तर पळता पाय काढून मध्येंच काव्यानें पराभव करावा. या मानानें पाहतां

मल्हाररावाचें हें कृत्य गर्हणीय असें मुळींच होत नाहीं. आकाशच फाटलें तेथें कोठवर ठिगळ लावणार ? मिळून सारांश, हें लढाईतून परत येणें कोणत्याच रीतीनें अश्लाघ्य नव्हे. कारण, एकतर, मराठ्यांचा पहिल्यापासून असाच रिवाज होता आणि असा रिवाज होता ह्मणून तर एवढालीं अचाट कामें इतक्या थोड्या काळांत त्यांनीं केलीं. पानिपतीं भयंकर कत्तल मराठ्यांची उडाली. जिकडे तिकडे हाकाहाक जाहली. तींतून मराठे ह्मणूनच चार दोनवर्षांत सांवरले आणि पूर्वापार आपला दबदबा त्यांनीं सर्व हिंदुस्थानभर बसविला. असो.

यानंतर मल्हाररावाचा रणसंग्राम नांव घेण्याजोगा काय तो राक्षसभुवनाच्या लढाईत जाहला. तेथें अगदीं ऐन प्रसंगीं माधवरावास "बाळा, आतां चलावें आणि माझी तलवार पाहावी." असें सांगितलें आणि मोठ्या निकरानें जाऊन खासा निजामावर हल्ला केला. मराठ्यांच्या सैन्याची दाणादाण अगोदर जाहली होती, ती उलट आतां निजामाच्या सैन्याची, मल्हारराव व माधवराव यांनीं केली. राघोबास कैद करून नेलें, पराभव जाहला ह्मणून सैन्य पळत सुटलें आणि पळत्या मराठ्यांवर दीनदीन करीत मोंगल चवताळून धांवत आहेत, अशा प्रसंगीं उलट खाऊन शत्रूला 'दे माय धरणी ठाय' असें करून तहाचें बोलणें लावावयास भाग पडावें, हा शौर्यप्रताप लहानसान नव्हे. असो.

सबंध चाळीस वर्षें अस्सल शिपाईगिरींत काढल्यानंतर मल्हाररावाचा येथला कारभार आटपला. त्यांनीं स्वर्गीं प्रयाण केलें ! मल्हारी धनगराचा सुभेदार मल्हारराव बनून आपल्या शौर्यदिनकरानें मी मी ह्मणणारांचे डोळे दिपविले; मेंढ्यासारखीं शिळपट जनावरें राखून उदरनिर्वाह करणारा, शूर शिपायांस खेळवूं लागला. इत्यादि जवानमर्दपणाचीं कृत्यें

किती ह्मणून तरी सांगावीं, आणि त्याच्या शौर्याचें वर्णन कोठवर करावें ! इतका वेळ त्याच्या आयु:क्रमांतील ठळक ठळक सांगवतील तितक्या गोष्टी सांगण्याचा यत्न केला. त्याची तलवार फत्ते असे, तितकी आमची लेखणी असती, अगर ती तलवार बाळगणाऱ्या मर्द गड्यांच्या आंगांत असणारें कर्तृत्व, ही लेखणी धरणाराच्या आंगीं असतें, तर, हें चरित्र फारच मनोवेधक व मनोरम जाहलें असतें; पण इलाज नाहीं. प्रस्तुत लेख लिहिणारा व त्याची लेखण यांची पुण्याईच सबळ ह्मणून, **मल्हारराव सुभेदारासारख्या** अतुलप्रतापी, नेकजात, स्वामिसेवापरायण आणि पूर्ण भाग्य व शौर्यशाली रणधुरंधराच्या अपूर्व कृतींचें थोडेंथोडकें आणि वेडेंविद्रें तरी कां होईना, वर्णन करण्याचें महायश लाधलें !

खचीत या **"मराठेगड्यां"सारखे अनंत उपकार** अ... **ह्या महाराष्ट्र मंडळावर कोणाचेच नाहींत.** धर्म, स... आणि प्राणापेक्षांही प्यार तो त्यांनीं राक्षिला; स्वतंत्रता व स्वराज्य यासारखा सत्य सुखावह अन्य लाभ या भूतलावर नाहीं आणि तो आह्मांस द्यावा ह्मणून कैक **"जवानमर्द मराठे गड्यांनीं"** आपल्या प्राणाची व इतर सर्वस्वाची काडीमात्र पर्वा बाळगिली नाहीं. आपला वचक लोकांवर असावा, आपणांकडे डोळा उघडून पाहीन ह्मटलें तर कोणाची प्राज्ञा नसावी, आणि आपलें नांव ऐकतांच थरकांप सुटेल इतकी कदर राहवी हें भाग्य आमच्या एवढ्या अफाट देशांत एकट्या मराठ्यांच्याच वांट्यास या "मर्द मराठे गड्यांनीं" आणून दिलें ! तेव्हां त्यांचे उपकार काय लहानसान ? ते फिटण्याची तरी का आतां आशा आहे ? कृतज्ञता बुद्धि आंगीं असेल—मात्र ओतप्रोत भरलेली—तर थोडें नाबहुत तरी त्या अविस्मार्य व अनिर्वाच्य उपकारऋणांतून

उतराई होण्याचा संभव आहे. उपकारकर्त्यांचें नामस्मरण, त्यांच्या चरित्राचें पठण, वगैरे साधनांनीं कृतज्ञता व्यक्त होते ही आह्मांत समज आहे. त्याच अनुरोधानें या "जवानमर्द मराठे गड्यां"पैकीं एकाचें चरित्र येथें आज सादर केलें आहे. तें वाचून आपल्या उपकारकर्त्यांची स्मृति कायम राहवी आणि त्याच्या अशेष व अस्सल वंशजांसंबंधानें पूज्यबुद्धि उपजावी अशी इच्छा आहे. ती पूर्ण करणारा ईश्वर समर्थ.